Reg. No. NP CITY/236/2018-20.

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १९] गुरुवार ते बुधवार, मे २१-२७, २०२६/वैशाख ३१-ज्येष्ठ ६, शके १९४८ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–अ-अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०७.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.चां.बाजार(सु.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-२१९४.—

ज्याअर्थी, चांदूरबाजार नगर परिषदेची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२८९९-४९-प्र. क्र. ३०-९९-नवि-३०, दिनांक ०१ मार्च, २००० (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिली आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक ०२ मे, २००० पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे "उक्त मंजूर सुधारित विकास योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, मौजा चांदूरबाजार येथील स.नं. ७६ पै. या जमिनींचे अंदाजे ०.१४० हे. क्षेत्र आ. क्र. १७ "पोस्ट ऑफिस", या आरक्षणाने (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) बाधित होत असल्याचे उक्त मंजूर सुधारित विकास योजना अहवालावरून दिसून येते आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे " अधिक्षक, पोस्ट ऑफिस " आहे (यापुढे "उक्त समूचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा चांदूरबाजार येथील स.नं. ७६/१ या जमिनीचे उक्त आरक्षणाने बाधित ०.१२ हे. क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक श्री. मधुसूदन हेमराजजी भुतडा व इतर १ यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजीची सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) नियोजन प्राधिकरण म्हणून, चांदुरबाजार नगर परिषदेवर दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी बजावली असून, ती पुढे नियोजन प्राधिकरणाकडून दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे पत्रान्वये, उक्त समूचित प्राधिकरणास पाठविण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकांनी मा. उच्च न्यायालय - मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १५५२/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९ जूलै, २०१९ रोजीच्या निर्णयान्वये (यापुढे "उक्त निर्णय" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीचे ०.१२ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ मधील तरतुदीनुसार, व्यपगत झाल्याचे घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूरबाजार यांनी उक्त सूचना ही, उक्त आरक्षणाचे भूसंपादनकामी त्यांचेकडील दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे पत्रान्वये उक्त समूचित प्राधिकरणास पाठविल्याचे आणि त्यावर उक्त समूचित प्राधिकरणाकडून विहीत कालावधीमध्ये जमीन खरेदी / भूसंपादनाबाबत कार्यवाही केलेली नाही, असे नमूद करून उक्त निर्णयानुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत होत असल्याने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे तरतूदींतर्गतचे आदेश प्रसिध्द करणेबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ९५/२०, दिनांक ०५ जून, २०२० अन्वये सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. ४६०, दिनांक ११ एप्रिल, २०२३ अन्वये, मा. उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयानुसार उक्त आरक्षण व्यपगततेसंदर्भाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित आवश्यक आहे, असा अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त जमिनीचे ०.१२ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस १८१३-३२११-प्र. क्र. ५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे-

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

परिशिष्ट

अ. क्र.	नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त आरक्षणे व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.)	उक्त जमिनीचा तपशील	भागशः व्यपगत झालेल्या उक्त आरक्षणाखालील अंदाजे क्षेत्र (हे.)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	चांदूरबाजार नगर परिषद, मौजा चांदूरबाजार, ता. चांदूरबाजार, जि.अमरावती.	आ. क्र. १७ "पोस्ट ऑफीस" क्षेत्र- ०.१४० हे.	स. क्र. ७६ पै.	०.१२ हे.

टीपः-१. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूरबाजार, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक २८ एप्रिल, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०८.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P-D.P.Ch. Bazar (R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-2194.—

Whereas, the Revised Development Plan of Chandur Bazar Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2899-49-CR-30-99-UD-30, dated 01st March, 2000 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dated 02nd May, 2000, (hereinafter referred to as "the said Sanctioned Revised Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, area admeasuring approximately 0.140 Ha. of the land bearing S. No. 76(Pt) of Mouza Chandur Bazar is affected by the Reservation No. 17, "Post Office" (hereinafter referred to as "the said Reservation") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is 'Superintendent of Post Office' (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan has come into force;

And whereas, the concerned land owners Shri. Madhusudan Hemrajaji Bhutada & other 1 (hereinafter referred to as "the said Land Owners") of the Land bearing S. No. 76/1 admeasuring area approximately 0.12 Ha. (hereinafter referred to as "the said Land") affected by the said Reservation had served a notice dated 28th September, 2015 as per the provisions of section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") to the Chandur Bazar Municipal

Council as Planning Authority on dated 30th September, 2015 which had been further sent to the said Appropriate Authority *vide* their letter dated 05th October, 2015;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 *(1)* of the said Act have been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, in the writ petition No. 1552/2018 filed by the said Land Owners in the Hon'ble High Court - Mumbai, Nagpur Bench, the Hon'ble High Court has declared *vide* decision dated 29th July, 2019 (hereinafter referred to as "the said Decision") that, the said Reservation on the said land admeasuring 0.12 Ha. is deemed to have been lapsed as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Chandur Bazar *vide* letter No. 95/20, dated 05th June, 2020, has submitted the proposal to publish the order under the provisions of section 127 of the said Act as the said Reservation on said Land is lapsed as per the said decision & mentioning therein that, the said notice had been sent *vide* their letter dated 05th October 2015 to the said Appropriate Authority for land acquisition of the said Reservation & on this, no action taken within the stipulated period in respect of land purchase / land Acquisition by the said Appropriate Authority;

And whereas, the Joint Director of Town planning, Amravati Division, Amravati vide letter No. 460, dated 11th April, 2023, has submitted report that, it is necessary to issue order under the provisions of section 127 *(2)* of the said Act as per the said decision for lapsing of the said Reservation;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Revised Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under provisions of section 127 *(2)* of the said Act, regarding the partial lapsing of the said Reservation on the area admeasuring approximately 0.12 Ha. of the said land;

And whereas, the Government in Urban Development Department as per provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the partial lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127 *(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouza, Taluka and District	Proposal in the said Sanctioned Revised Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report	Description of the Land	Approximate Area underthe said Reservation lapsed (Ha.)
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1.	Chandur Bazar Municipal Council, Mouza Chandur, Tal. Chandur Bazar, Dist. Amravati.	Reservation No.17, "Post Office" Area 0.140 Ha.	S. No. 76 (pt.)	0.12 Ha.

Note:-

1. The said land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Revised Development Plan.
2. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Chandur Bazar, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.
3. This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune:
Dated the 28 th April, 2026.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र.१०९.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.चां.रेल्वे (सु.)-कलम १२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-२३०१.—

ज्याअर्थी, चांदूर रेल्वे नगर परिषदेची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२८०७-९७८-प्र. क्र.२०४(बी)-२००७-नवि-३०, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक ०१ नोव्हेंबर, २००९ पासून अंमलात आलेली आहे, तर त्यामधील वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिध्द

विकास योजना अधिसूचना क्र. टिपीएस- २८१३-१६२६-प्र.क्र.३३९-२०१३-नवि-३०, दिनांक ०३ मार्च, २०१४ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना " असे संबोधिले आहे) मंजूर झाली असून, ती दिनांक ०३ एप्रिल, २०१४ पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे "उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजनेमध्ये ई.पी. ६ अन्वये, मौजा चांदूर रेल्वे येथील स.नं. २७ पै. या जमिनींचे अंदाजे ०.८४ हे. क्षेत्र आ. क्र. २१ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान", या आरक्षणाने (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) बाधित होत आहे, आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे 'मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूर रेल्वे, आहे (यापुढे "उक्त समूचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा चांदूर रेल्वे येथील स.नं. २७, या जमिनीचे उक्त आरक्षणाने बाधित ०.७८ हे. क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) यांचे वतीने ॲड. श्री. अलोक डागा यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये दिनांक १६ जानेवारी,२०२१ रोजीची सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) उक्त समूचित प्राधिकरणास दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकांनी मा. उच्च न्यायालय - मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ६४१/२०२४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या निर्णयान्वये (यापुढे "उक्त निर्णय" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीचे बाधित क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ मधील तरतूदीनुसार, व्यपगत झाल्याचे व त्यासंदर्भाने अधिसूचना निर्गमित करणेबाबत निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूर रेल्वे यांनी निधी अभावी विहीत कालावधीमध्ये उक्त आरक्षणाचे भूसंपादनाबाबत कार्यवाही करणे शक्य झाले नाही, करिता उक्त आरक्षण व्यपगत करणेबाबत उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीकरिताचा प्रस्ताव पत्र क्र. ९८/२०२६, दिनांक २७ जानेवारी,२०२६ अन्वये सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. I- ९६९५९०, दिनांक २६ मार्च, २०२६ अन्वये, उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून विहीत दहा वर्षांचा कालावधी होण्यापूर्वीच उक्त सूचना बजावली असल्यामुळे विधीग्राह्य नसल्याचे तथापी, असा दहा वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर उक्त निर्णय पारित झाला असल्याचे व मा. उच्च न्यायालयाने उक्त आरक्षण व्यपगत ठरविले असल्यामुळे, आरक्षणाच्या व्यपगततेबाबतचे आदेश निर्गमित करणेविषयी संचालनालयाचे स्तरावर अंतीम निर्णय होणे उचित होईल, असा अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती व मा. उच्च न्यायालयाचे उक्त निर्णय विचारात घेता, उक्त जमिनीचे ०.७८ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र.टिपीएस १८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक ०१डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे-

उक्त मंजूर पुनर्प्रसिध्द विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

परिशिष्ट

अ. क्र.	नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर पुनर्प्रसिद्ध विकास योजनेतील उक्त आरक्षणे व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.)	उक्त जमिनीचा तपशील	व्यपगत झालेल्या उक्त आरक्षणाखालील अंदाजे क्षेत्र (हे.)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	चांदूर रेल्वे नगर परिषद, मौजा चांदूर रेल्वे, ता. चांदूररेल्वे, जि.अमरावती.	आ. क्र. २१ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" (क्षेत्र- ०.८४ हे.)	स. क्र. २७ पै.	०.७८ हे.

टीपः-

१. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर पुनर्प्रसिद्ध विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर पुनर्प्रसिद्ध विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूररेल्वे, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ४ मे, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११०.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P-D.P.Ch. Bazar (R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-2301.—

Whereas, the Revised Development Plan of Chandur Railway Municipal Council has been sanctioned partly as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS- 2807-978-CR-204-2007-UD-30, dated 31st August, 2009 & has come into force with effect from dated 01st November, 2009 whereas, the Republished Development Plan of Excluded Part in it, has been sanctioned *vide* Notification No. TPS- 2813-978-CR-204-2007-UD-30, dated 03rd March, 2014 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dated 03rd April, 2014, (hereinafter referred to as "the said Sanctioned Republished Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Republished Development Plan *vide* E.P./6, the Reservation No. 21, "Primary School & Play Ground" affects an area admeasuring approximately 0.84 Ha. of the land bearing S. No. 27(Pt) of Mouza Chandur Railway (hereinafter referred to as "the said Reservation") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is 'the Municipal Council, Chandur Railway' (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Republished Development Plan has come into force;

And whereas, on behalf of the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the Land bearing S. No. 27 admeasuring area approximately 0.78 Ha. (hereinafter referred to as "the said Land") affected by the said Reservation, Adv. Shri. Alok Daga had served a notice dated 16th January, 2021 as per the provisions of section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") to the said Appropriate Authority which had been received by the said Appropriate Authority on dated 18th January, 2021;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 *(1)* of the said Act have been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, in the writ petition No. 641/2024 filed by the said Land Owner in the Hon'ble High Court- Mumbai, Nagpur Bench, the Hon'ble High Court has *vide* decision dated 14th July,2025 (hereinafter referred to as "the said Decision") that, the said Reservation on the affected area of the said land declared as lapsed as per the provisions of section 127 of the said Act & directed to issue notification in this regards;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Chandur Railway vide letter No. 98/2026, dated 27th January, 2026, has submitted the proposal for further process as per the provisions of section 127 of the said Act for lapsing of the said Reservation as no land acquisition of the said Reservation could have been possible in stipulated period due to non-finance;

And whereas, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati *vide* letter No. I-969590, dated 26th March, 2026, has submitted report that, however the said Notice is not tenable as issued before completing the stipulated period of 10 years of the said Sanctioned Republished Development Plan came into force, the said Decision is issued after such period of 10 years & as Hon'ble High Court has declared the said Reservation is lapsed, it is necessary on Directorate level to make final decision to issue order in respect of lapsing of the said Reservation;

And whereas, after considering the above facts and the said Decision of the Hon'ble High Court in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Republished Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under provisions of section 127*(2)* of the said Act, regarding lapsing of the said Reservation on the area admeasuring approximately 0.78 Ha. of the said land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211/CR- 508-UD-13, dated 01st December,2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the partial lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Republished Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Republished Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouza, Taluka and District	Proposal in the said Sanctioned Republished Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report	Description of the Land	Approximate Area under the said Reservation lapsed (Ha.)
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1.	Chandur Railway Municipal Council, Mouza Chandur Railway, Tal. Chandur Railway, Dist. Amravati.	Reservation No.21, "Primary School & Play Ground" (Area 0.84 Ha.)	S. No. 27 (pt.)	0.78 Ha.

Note:-

1. The said land so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Republished Development Plan.
2. A copy of the part plan of the said Sanctioned Republished Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Chandur Bazar, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.
3. This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune:
Dated the 4th May, 2026.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र.१११.

मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून

क्रमांक नपंमा.-१६३८-२०२६-

शुद्धीपत्र

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार मालेगाव विकास योजनेतील फेरबदलचा प्रस्ताव महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अ अमरावती विभागीय पुरवणी, ऑगस्ट २८- सप्टेंबर, ०३,२०२५ रोजी पृष्ठ क्र. १७१ व १७२ वर प्रसिद्ध झाली. त्यात मालेगाव शहराची सुधारित विकास योजना शासनाचे नगर विकास ठराव क्र.टिपीएस ४१२३-१६०-प्र.क्र.२८-२०२३-वि.यो. मंजुरी (भागशः)-नवि-३०, दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ (भागशः मंजूर)करण्यात आली असून दिनांक १३ सप्टेंबर २०२४ पासून अंमलात आलेली आहे. **ऐवजी** मालेगाव शहराची सुधारित विकास योजना शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-४१२३-१६०-प्र.क्र.२८ -२०२३-वि.यो. मंजुरी (भागशः) - नवि -३०, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ (भागशः मंजूर) करण्यात आली असून दिनांक ०६ नोव्हेंबर,२०२४ पासून अंमलात आली **असे वाचावे**.

आता, त्याअर्थी,उक्त फेरबदल बाबत काही सूचना व हरकती असल्यास ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात नगर पंचायत, मालेगाव कार्यालयात नोंदयाव्यात त्याचा विचार शासनाला प्रस्ताव सादर करते वेळी करण्यात येईल.

पंकज सोनुने,
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, मालेगाव .

मालेगाव :
दिनांक २३ जानेवारी, २०२६

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११२.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

CORRIGENDUM

No.NPM-1638-2026—

Under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the proposal for amending the village Development Scheme was Published in the Maharashtra Government Gazette, Part-1 A Supplement, Amravati Division, Dated 28th August-03rd September, 2025, from Page No.171 to 172 in it. The Development Plan of Malegaon has been sanctioned by Govt. of Maharashtra State Accompaniment Of Government Notice No. TPS-4123-160-CR-28-EP-Publication-2023-UD-30,dated 13th September, 2024 and force with effect from 13th September, 2024 for the date.It should be *Read* as the Development Plan of Malegaon has been sanctioned by Govt. of Maharashtra State Accompaniment Of Government Notification No. TPS-4123-160-CR-28-2023-DP Sanction (Partly)-UD- 30,dated 13th September, 2024 and force with effect from 06th November, 2024 for the date.

Now, therefore, any person having objections or suggestions regarding proposed modification may Communicate in writing to the Nagar Panchayat Malegaon within Thirty (30) days from the date of Publication of the *Official Gazette* notification. It shall be considered by the Nagar Panchayat, Malegaon before submitting the proposal of modification to Government for sanction.

PANKAJ SONUNE,
Chief Officer,
Nagar Panchayat, Malegaon.

Malegaon:
Dated the 23rd January, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.